देशोन्नती
12/06/2023
माझं शहर

# किनवट पोलिसांनी मोटार सायकल चोरट्यांना केले जेरबंद

## चोरट्यांकडून १० मोटार सायकल केल्या हस्तगत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**किनवट** ■ शहर व परिसरातील दुचाकी मोटरसायकल चोरीच्या घटना घडलेल्या असून त्यावर आवर घालण्यासाठी व आरोपी ताब्यात घेण्यासाठी किनवट पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दीपक बोरसे यांनी किनवट गुन्हे शोध पथकांची नियुक्ती करून गाडी चोरी करणाऱ्यांना एका आरोपीस ताब्यात घेऊन त्याचा साथीदार असलेल्या दुसऱ्या आरोपीलाही ताब्यात घेत त्या आरोपींकडून १० मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत.

किनवट पोलिस स्टेशनच्या हद्दीमध्ये मोटारसायकल चोरी जाणे ही नित्याचीच बाब बनली होती. वारंवार तक्रारी देऊनही फिर्यादींना कोणताही न्याय मिळत नसल्याने पोलिसांबद्दल वेगळी भावना निर्माण झाली होती. परंतु किनवट पोलिस स्टेशनला आलेले कर्तव्यदक्ष अधिकारी पोलिस निरीक्षक दीपक बोरसे यांनी मोटारसायकल चोरट्यांना बेड्या घालण्यासाठी किनवट गुन्हे शोध पथकाची नियुक्ती करून फिर्यादीच्या आधारे गाड्या चोरी करणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी झालेल्या १० दुचाकी हस्तगत केल्या. ज्यांच्या दुचाकी वाहन चोरी गेलेले आहे, त्या वाहनधारकाने वाहनाचे कागदपत्र सोबत आणून वाहनाचे चेचीस नंबर, इंजन नंबर पडताळून त्यांना ताब्यात देणार असल्याची माहिती पोलीस सूत्राकडून मिळाली असून मोटारसायकल चोरट्यांमध्ये या बाबीबद्दल धास्ती बसली आहे. या त्यांच्या कामगिरीबद्दल पो. नि. बोरसे व सर्व पोलिस कर्मचाऱ्यांबद्दल नागरिकांमध्ये त्यांचे कौतुक केल्या जात असून भविष्यात दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपींना कडक सजा व्हावी व शहरातील वाहने व घरफोड्या यांना आवर घालावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. (श.प्र.)



किनवट पोलिस स्टेशन हे जिल्ह्यापासून दीडशे किलोमीटर अंतरावर असून या पोलिस स्टेशनला जवळपास ७३ गावांचा पदभार असल्यामुळे येथे नियुक्ती असलेल्या कर्मचाऱ्यांचे संख्या बळ कमी प्रमाणात आहे व काही बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी तात्काळ पोलीस अधीक्षकांनी येथे नियुक्त असलेला संपूर्ण पोलीस स्टॉप द्यावा, अशी मागणी येथील नागरिकांमधून होत आहे.